वाचले: 1. उप विभागीय अधिकारी तळोदा भाग तळोदा यांचे कडील आदेश क्र.एनएएसआर 1995/2/95 दिनांक 7.4.1995

2. नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग नंदुरबार यांचे कडील पत्र क्रमांक क्र.जा.क्र.ससंनर-नंदु/बांध.पर/मौजे कुकडेल/ता.शहादा/सं.नं.63/भु.क्र. 16 ते 20/1134/ दि. 12.10.2017

3. तहसीलदार शहादा पत्र क्र.गावठाण /कावि/46/2018 दि. 10.01.2018 चा अहवाल.

क्र. बिनशेती/कावि/ 85 /2018
उपविभागीय अधिकारी कार्यालय, शहादा
दि.29/01/2018

आ दे श

श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी यांनी त्यांचे नावावरील मौजे कुकडेल ता शहादा जिल्हा नंदुरबार येथील स.नं. 63 मधिल भूखंड क्र. 16+17+18+19+20अ+20ब एकत्रीकरणास मंजुरी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार, शहादा यांनी चौकशी करुन सविस्तर अहवाल पत्र क्र.गावठाण /कावि/46/2018 दि. 10.01.2018 अन्वये अहवाल सादर केला आहे. तहसिलदार, शहादा यांचे सदर अहवालानुसार श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी यांचे नावावरील मौजे कुकडेल ता शहादा जिल्हा नंदुरबार येथील .नं. 63 ही शेतजमिन उप विभागीय अधिकारी तळोदा भाग तळोदा यांचे कार्यालयाचे आदेश आदेश क्र.एनएएसआर 1995/2/95 दिनांक 7.4.1995 अन्वये रहिवास प्रयोजनार्थ बिनशेतीकडे वर्ग करण्यात आलेली. तसेच सदर बिनशेती झालेल्या स.नं. ची सनद मंजूर करण्यात आलेली असुन सदरचे भूखंड एकत्रिकरण करणेकामी तहसिलदार, शहादा यांनी शिफारस केलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग नंदुरबार यांचे पत्र क्रमांक क्र.जा.क्र.ससंनर-नंदु/बांध.पर/मौजे कुकडेल/ता.शहादा/सं.नं.63/भु.क्र. 16 ते 20/1134/ दि. 12.10.2017 अन्वये सदर भूखंड एकत्रिकरणासाठी शिफारस करण्यात आलेली आहे. सदर शिफारसीप्रमाणे भूखंडांचे एकत्रिकरणापूर्वी व एकत्रिकरणानंतर स्थिती खालीलप्रमाणे होणार आहे.

एकत्रीकरणापुर्विचे एकुण क्षेत्र			
स.नं.	प्लॉट नं.	क्षेत्र चौ.मी.	कब्जेदार सदरी असलेले नाव
मौजे कुकडेल ता.शहादा येथील स.नं. 63 मधिल भूखंड क्र. 16+17+18+19+20अ+20ब	16	150.00	श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी
	17	150.00	
	18	172.15	
	19	163.80	
	20अ	145.50	
	20ब	147.50	
एकुण		928.95	

एकत्रीकरण केल्यानंतरचे		
प्लॉट नं.	क्षेत्र चौ.मी.	कब्जेदार सदरी असलेले नाव
भूखंड क्र. 16+17+18+19+20अ+20ब	928.95	श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी
एकुण	928.95	

संदर्भातील अ.क्र.1 चे आदेशातील अटीनुसार नुसार भुखंडधारकाने तीन वर्षाचे आत बांधकाम करणे आवश्यक होते. तथापी त्यांनी शर्तभंग केल्याने त्यांचेकडून रक्कम रु.500/- (रु.पाचशे मात्र) दि. 25.01.2018 रोजी सरकार जमा करुन घेण्यात आलेले आहेत.

उक्त परिस्थिती विचारात घेता मौजे कुकडेल ता शहादा जिल्हा नंदुरबार येथील .नं. 63 मधिल भूखंड क्र. 1+17+18+19+20अ+20ब एकत्रीकरणास खालील अटि / शर्तीवर मंजूरी देण्यात येत आहे.

शर्ती :-

1. एकत्रिकरण करुन उपविभागणी केलेल्या भुखंडाचे म. उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांचे पुर्व मंजुरीशिवाय पुन्हा विभाजन करता येणार नाही.
2. सदरची परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व त्याखालील नियमानुसार करण्यात येत आहे.
3. सदरच्या एकत्रित भुखंडावर करावयाचे बांधकाम आराखडे समुचित प्राधिकरणाकडुन मंजुर करुन घ्यावदे.
4. नगर रचनाकार,नंदुरबार यांचे दि. 31.10.2017 चे पत्रातील अटी / शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.
5. प्रस्तुत स.न.108/2 मधील बिनशेती आदेशातील नमूद सर्व अटी / शर्ती सर्व एकत्रिकरण केलेल्या भुखंडावर निरंतर लागु राहतील.
6. सनद मधील सर्व अटी / शर्ती सर्व एकत्रिकरण केलेल्या भुखंडावर निरंतर लागु राहातील.
7. मुळ भुखंडावरील इतर हक्कातील नोंदी एकत्रिकरण केलेल्या भुखंड धारकानुसार नोंदणी कराव्यात.
8. अर्जदाराने चौकशी कामी पुरविलेली माहीती खोटी आढळल्यास किंवा वरील प्रमाणे कोणत्याही अटी / शर्तीचा भंग केल्यास सदरचा आदेश रद्द करणेत येईल व त्याप्रमाणे पुढील उचित ती कायदेशिर कार्यवाही केली जाईल.

उपविभागीय अधिकारी शहादा, भाग-शहादा

सही/-
उपविभागीय अधिकारी
शहादा भाग शहादा

प्रति :-
श्री. श्रीकृष्ण प्रल्हाद चौधरी रा शहादा जि. नंदुरबार

प्रत :- तहसीलदार, शहादा
प्रत :- तलाठी कुकडेल ता. शहादा जि. नंदुरबार
2/- सदर आदेशाची प्रत संबधितास बजविणेत यावी.
3/- गाव दफ्तरी योग्य त्या नोंदी घेण्यात याव्यात.

उपविभागीय अधिकारी
शहादा भाग शहादा